# संवेदनशील आणि सर्जनशील 'विभूती'!

**प्रा. राजेंद्र मुंढे**

## परिचय

१९५६ च्या उदयानंतर प्रगतिशीलतेचा तिलिस्म तुटू लागला. फिराख गोरखपुरी, लक्ष्मीकांत वर्मा, धर्मवीर भारती यांच्यासारखे प्रगतिशील परंतु मानवी मूल्यांची बाजू घेणारे लेखक-साहित्यिक पुढे आले. येथून साहित्याचा एक नवा प्रवाह सुरू झाला. अशातच आपल्या लेखणीला प्रवाहित करणारे आणि तत्कालीन साहित्यिकांमध्ये आपले सामाजिक वैभव संवेदनशीलतेने प्रकट करणारे विभूती नारायण राय 'शहर में कर्फ्यू'ची संवेदना घेऊन आले.

आज तमाम शैक्षणिक संस्थांमध्ये प्रगतिशील की जनवादी, यावर चर्चा होत आहे. प्रगतिशील प्रतिष्ठानातून बरेच बुद्धिवादी प्रेमचंदच्या काळात म्हणजे १९५६ मध्ये लखनऊमधून निर्माण झाले. बरेचसे लेखक, कलावंत, नाटककार इत्यादींनी आपल्या विविध बाह्यछटांनी क्षणभर सर्वांना चकित तर जरूर केले. परंतु वास्तवाच्या नावावर जो कॅनव्हास तयार केला त्यावर आपलंच चित्र काढलं, सामान्य लोकांसाठी केवळ व्यासपीठांवरून बोलणं एवढंच ते करू शकले.

१९५६ च्या उदयानंतर प्रगतिशीलतेचा तिलिस्म तुटू लागला. फिराख गोरखपुरी, लक्ष्मीकांत वर्मा, धर्मवीर भारती यांच्यासारखे प्रगतिशील परंतु मानवी मूल्यांची बाजू घेणारे लेखक-साहित्यिक पुढे आले. येथून साहित्याचा एक नवा प्रवाह सुरू झाला. अशातच आपल्या लेखणीला प्रवाहित करणारे आणि तत्कालीन साहित्यिकांमध्ये आपले सामाजिक वैभव संवेदनशीलतेने प्रकट करणारे विभूती नारायण राय 'शहर में कर्फ्यू'ची संवेदना घेऊन आले.

२८ नोव्हेंबर १९५१ रोजी उत्तर प्रदेशातील आजमगढच्या जोकहरा गावात जन्मलेल्या राय यांनी बनारस व अलाहाबाद येथून शिक्षण घेतले. १९७१ मध्ये इंग्रजी साहित्यात एम.ए.ची पदवी संपादन केली आणि १९७५ मध्ये भारतीय पोलिस सेवेत दाखल झाले.

मार्क्सवादी विचारसरणीचे पाईक असलेले विभूती नारायण राय म्हणतात की, ही विचारसरणी आस्थेला नव्हे तर विवेकाला सक्षम करते. मला मार्क्सवादाने खूप बळ दिले. याच शक्तीने मी आशावादी आणि नास्तिक झालो. विचारपूर्वक नास्तिक झाल्याचा एक मोठा फायदा असा झाला की, मी कधीही ईश्वराकडे समस्येचा निराकरणकर्ता म्हणून बघितलं नाही. एवढेच नव्हे तर काश्मीरमध्ये दोन वर्षांकरता झालेल्या नियुक्तीच्या काळातही मला परमेश्वर आठवला नाही. या काळात अनेक प्रसंग असे आले की, आता घरी परत जाता येईल की नाही, असं वाटत होतं. आशावादाने आस्था जागवल्या. मी मार्क्सवादाचा आभारीही आहे, कारण याच बळामुळे जातीय दंगलीच्या काळातसुद्धा मला कट्टर हिंदू होण्यापासून दूर राहता आले. सरकारी सेवेत असतानाही हिंदुत्वाच्या विरोधात निर्भयपणे बोलता आलं.

विभूती नारायण राय यांनी पोलिस सेवेत राहूनही साहित्याशी आपली नाळ कायम ठेवली, हे निश्चितच प्रभावित करणारं ठरावं. हे जीवन जगत असताना साहित्याशी सांगड कशी घालावी याविषयी ते म्हणतात की, साहित्यामुळे मला माणूस होण्यास मदत मिळाली. इतर सरकारी नोकरीच्या तुलनेत पोलिस सेवेत संवेदनहीन होण्याची शक्यता अधिक आहे. येथे अमानुष होण्याची प्रक्रिया इतकी तीव्र आहे की, त्याचा सुगावाही लागत नाही. म्हणून मनुष्यत्व कायम ठेवण्यासाठी साहित्य हेच प्रभावी शस्त्र असू शकतं, असं मला वाटतं.

सर्वश्रेष्ठ आयपीएस अधिकारी म्हणून राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित राय यांचे व्यक्तिमत्त्व आणि कृतित्व बहुआयामी असंच आहे. एकेकाळी भारताचं ऑक्सफर्ड म्हणून अलाहाबाद विद्यापीठाचा नावलौकिक होता. या विद्यापीठातून त्यांनी इंग्रजी साहित्यातून एम. ए. केलं. परंतु



त्यांनी राष्ट्रभाषा हिंदीची सेवा करण्यासाठी स्वतःला वाहून घेतलं. डॉ. हरिवंशराय बच्चन, प्राचार्य मनोरंजन प्रसाद सिंह, डॉ. रामविलास शर्मा या इंग्रजी साहित्याच्या विद्यार्थ्यांनी पुढे हिंदीची सेवा केली तशीच त्यांनीही केली. विभूती नारायण राय हे महान संवेदनेचे धनी आहेत. 'सांप्रदायिक दंगे और भारतीय पुलिस' यासारखे संशोधनपर पुस्तक त्यांनी पोलिस सेवेत राहून लिहिले. या पुस्तकाच्या पानापानातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदना वाचता येतात.

बालवयापासूनच विभूती नारायण राय यांच्यात सर्जनशीलतेची आग धगधगत असावी. पुस्तकं त्यांची नेहमीच मित्र राहिली. त्यांना वाचनाची गोडी शालेय जीवनापासूनच लागली आणि पुढे ती वृद्धिंगत झाली. लहान भाऊ विकास आणि त्यांच्यात पुस्तक कोण आधी आणि किती जास्त वाचेल, यावरून शर्यत लागायची. या शर्यतीचाच परिपाक की काय, पुढे त्यांची पुस्तक आणि साहित्याशी मैत्री झाली. ग्रंथप्रेमातून त्यांनी आपल्या गावात 'रामानंद सरस्वती ग्रंथालय' स्थापन केलं. या ग्रंथालयाने आजमगढच्या परिसरात वाचनसंस्कृती विकसित केली आहे.

विभूती नारायण राय यांना साहित्यिक वैभव आहे. त्यांच्यात कवितांमधील संवेदना दिसून येतात. रामविलास शर्मा, नामवर सिंग, आचार्य रामचंद्र शुक्ल यांच्यासारख्या विद्वानांप्रमाणे त्यांनी आपल्या प्रारंभीच्या काळात कवितेच्या प्रांतात वावर केला आहे. आजीकडून ऐकलेल्या कथा पुढे त्यांच्या साहित्याचा विषय झाल्या. त्या प्रेरणेने ते कथेच्या प्रांतात शिरले. त्यांची 'तबादला' ही कादंबरी तर विस्थापनाच्या दुःखावरच आहे. विस्थापनातून विकास कसा शक्य आहे, हे त्यांनी मोठ्या खुबीने 'तबादला'मध्ये मांडलं आहे. त्यांनी सरकारी नोकरदारांना बदलीविषयी कसे अनुभव येतात, हे प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त केलं आहे.

सामाजिक सलोख्याविषयी जेव्हा बोललं जातं तेव्हा प्रो. असगर अली इंजिनीयर आणि प्रो. राम पुनियानी यांच्यासोबतच विभूती नारायण राय यांचं नाव येतंच. त्यांचं कर्म आणि साहित्य यांच्या केंद्रस्थानी सलोखा, भारतीय समाज आणि भारतीय संस्कार आहेत. दंगलीचं राजकारण, सामाजिक, मानसशास्त्रीय व आर्थिक तसेच भाषाशास्त्रीय विश्लेषण यांचं प्रतिबिंब 'शहर में कर्फ्यू'मध्ये दिसून येतं. जातीय दंगलीचं पोस्ट मॉर्टेमच त्यांनी यातून केलं आहे. 'एक छात्र नेता का रोजनामचा' हे त्यांचं विद्यार्थी जीवनातील पुस्तक. युवावस्थेतील वादळी अनुभव त्यांनी या पुस्तकातून मांडलेत. विद्यार्थीदशेतील चित्रपटच त्यांनी या पुस्तकातून साकारला आहे. त्यांच्या 'तबादला' या कादंबरीला इंदू शर्मा आंतरराष्ट्रीय कथा पुरस्कार तसंच 'किस्सा लोकतंत्र'ला उत्तर प्रदेश हिंदी संस्थानचा पुरस्कार मिळाला आहे.

एक उच्चपदस्थ पोलिस अधिकारी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचा कुलगुरू म्हणून जेव्हा विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक विकासाला तेवढ्याच उंचावर नेऊन ठेवतो, तेव्हा त्यांच्यातील प्रशासकीय आणि शैक्षणिक गुणवत्ता अधिक प्रखरतेने पुढे येतं, ते कलेचे भोक्ते आहेत. म्हणून कलावंताप्रमाणे ते नेहमी नवे प्रयोग हाती घेतात. गेल्या २० वर्षांहून अधिक काळापासून नियमित प्रकाशित होत असलेलं 'वर्तमान साहित्य' हे त्यांच्यातील सर्जनशील कलावंताचं प्रतीकच आहे. संस्थापक, संपादक या नात्याने त्यांना संपादक आणि एक दूरदर्शी पत्रकारच संबोधता येईल. त्यांनी ब्रिटिशकालीन जीवनशैलीवर लिहिलेलं 'प्रेम की भूतकथा' हे पुस्तक तर साहित्याच्या प्रांतातील एक आगळं-वेगळं पुस्तक ठरावं. प्रेम, समाज, सत्ता आणि मीडिया या विषयाला धरून त्यांनी जी मांडणी केली आहे, ती मसुरीच्या परिसरात एक मिथक म्हणून नावारूपाला आली आहे.

त्यांचा साहित्यप्रवास अजून थांबलेला नाही. आपली सर्जनशीलता ते आताही सांभाळत आहेत. विद्यापीठासारख्या उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात एक सुप्रीम ऑथोरिटी असताना त्यांची साहित्यिक भूक शमलेली नाही. एक सर्जनशील व्यक्ती म्हणून त्यांची साहित्य आणि शैक्षणिकक्षेत्रातील वीण अधिक घट्ट होत आहे.

*